# <u>आजची धिटाई ही भविष्यातील गरज</u>

आम्ही स्त्रिया दिवाळी- १९९६

महिलांचा सर्वच क्षेत्रातील वाढता सहभाग लक्षात घेतल्यावर त्याबाबत मनांत कांही प्रश्न निर्माण होतात. त्यांचीच चर्चा इथे प्रस्तुत आहे. सरकारी क्षेत्रात याचा काय परिणाम होईल असा पहिला प्रश्न मनांत येतो. स्त्रियांचा सहभाग सर्व क्षेत्रात वाढणार आहे हे निश्चित. सरकारी क्षेत्रात देखील हा सहभाग वाढणार आहेच. हा कशाप्रकारे हाताळला जाणार त्याचा एक नमुना विचारात घेउ या. असं पहाण्यांत येतं की अर्थार्जनासाठी व करियर करण्यासाठी जेंव्हां स्त्रिया घराबाहेर पडतात तेव्हा त्या सर्वच क्षेत्रात येण्यासाठी धडपडतात. साहजिकच पुरूष अधिकारी अशी मखलाशी करतात कि त्या कार्यालयांत काम करणा-या एखाद्या स्त्री अधिकरी कडेच सर्व महिला स्टाफ द्यायचा. स्त्रियाना येणारी सगळयांत पहिली अडचण घर आणि ऑफिस या मधे वेळेचे वाटप कसे करावे ही असते. ही अडचण पुरुषांच्या बाबतीत जवळजवळ नसतेच. वरिष्ठ स्त्री अधिकरी म्हणून माझा याबाबतीत अनुभव असा की, पूर्वी दोन - तीन स्त्रिया माझ्या विभागात होत्या तेंव्हा त्या सर्वांना मी साडेपाच वाजता घरी जाऊ देत असे. पण एकदा मला सांगण्यात आले की तुम्ही लेडी ऑफिसर आहात तेव्हा तुमच्या हाताखाली सर्वच स्त्री कर्मचारी वर्ग आम्ही देऊ. सर्व स्त्रियांना घेऊन कार्यालय चालविण्यात मला काही अडचण नव्हती पण यामागे काही 'लॉजिक' नव्हतं, त्यामुळे मी विरोध केला होता. मात्र माझे वरिष्ठ अधिकारी कलेक्टर यांना हे पटेना की माझ्याकडे सर्वच स्त्री क्लार्कचा स्टाफ देणे योग्य नाही. त्यांचा आग्रह कायम राहिला. त्यानंतर माझ्या असेही लक्षात आलं की सगळ्या महिला कर्मचारी असतील तर मी सगळ्यांना साडेपाच वाजता घरी जायला परवानगी देऊ शकणार नाही. कारण मी स्वतः बहुतेक वेळा उशीरापर्यंत ऑफिसात काम करीत असते. मग मी असं ठरवलं की, या बायकांना थोडी उशिरा येण्याची परवानगी दिली तर त्या उशीरापर्यंत थांबतील. मग त्यांनी आपापसात दिवस आणी महिने ठरवून तशी 'तडजोड' करावी असे मी सुचवले. अशा त-हेने आम्ही त्या प्रश्नाशी जुळवून घेतले. मात्र वरिष्ठ अधिका-याने दाखवलेली ही मखलाशी चुकीचीच आहे असे मला वाटते कारण पूर्ण ऑफिस कसे सुरळित चालेल हे पाहणे त्यांचे प्रथम कर्तव्य होते. यामधे तुम्ही बायका बायका कांय ते निभवा हा जो दृष्टिकोन दाखवला गेला तो मला चुकीचा वाटतो.

स्त्रियांच्या कामाबाबत वरिष्ठांचे कसे गैरसमज असतात याचे दुसरे उदाहरण माझेच आहे. मी सांगलीला कलेक्टर असताना तलाठयाच्या पदासाठी एका महिलेने अर्ज केला होता. तलाठ्याच्या पदासाठी महिला ही कल्पना मला तेव्हा योग्य वाटली नाही कारण मी कलेक्टर म्हणून काम करते तेंव्हा उशीरापर्यंत थांबण्यासाठी किंवा साईटवर जाण्यासाठी मला ज्या सुविधा मिळतात त्या तलाठी पदावर काम करताना तिला मिळणार नाहीत. मग रात्री ११-१२ वाजता कुठे जायची वेळ आली तर ती कशी जाणार? तेव्हा त्या महिला उमेदवाराने तडजोड केली व कार्यालयीन क्लार्कचे काम स्वीकारले. पण या घटनेनंतर सुमारे तीन वर्षांनी माझ्यापेक्षा ८-९ वर्षांनी ज्युनियर असलेल्या संजीवनी कुट्टी या ऑफिसरने तलाठयाच्या पदावर काही महिलांच्या नेमणुका केल्या देखील आणी कौतुकाने मला तसा फोन करून सांगितलं. म्हणजे तीन वर्षांत हा काळ असा बदलला, पुढे अजून काही बदल होतील. मृदुला लाड (पोलीस सुपरिटेंडेंट मुंबई) यांनी हा बदल चांगला असल्याचे सिद्ध करून दाखविले आहेच. संजीवनी ने मला तिने केलेल्या नेमणूकींची बातमी सांगितली तेंव्हा माझी प्रतिक्रिया होती की मी चुकले - मलाही तेच करायला हवं होत.

पूर्वीपेक्षा कार्यालयांमधे स्त्रियांची संख्या वाढणार हे गृहीत धरून शासनाने सोई सुविधांबाबत कांही स्टॅण्डर्ड ठरवणे गरजेचे आहे. हा एक महत्वाचा मुद्दा आहे. ज्या ज्या ठिकाणी महिलांची संख्या आहे व वाढणार आहे तिथे त्यांच्यासाठी वेगळी प्रसाधनगृहे असायला हवीत. पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाच्या कामात असताना आम्हाला असं लक्षात आलं की, महिलांसाठी नुसती प्रसाधनगृहे असून चालणार नाही तर त्यांच्यापैकी कधी कुणाला काही कारणाने जरा आडवं व्हावसं वाटलं तर एखादे छोटे का होईना आरामगृह असायला हवे. त्यातच डबा खाण्यासाठी जागा असावी.

जेंव्हा एखादया कार्यालयाकडे स्त्रियांची संख्या वाढत असते तेंव्हा त्या ठिकाणी अगदी पाळणाघर नसल तरी चालेल, पण किमान शिशुघर तरी नक्की असावे. उदाहरणार्थ रोजगार हमी योजनेची कामे चालतात तेव्हा दहापेक्षा जास्त स्त्रिया असल्या तर पाळणाघर आवश्यक आहे अशी तरतूद आहे. मात्र अशा सोयी वाढविणे आवश्यक आहे. या शिशुघरासाठी देखरेख करणारी महिला, काही खेळणी पुस्तके ही

देखील सोय हवी. कर्मचा-यांच्या दृष्टिकोनातून हे आवश्यक आहे तसेच अधिका-यांना भेटायला येणा-या व्यक्तिंची देखील ही गरज आहे असं आमच्या लक्षात आलं.

महिलांचा सहभाग वाढावा यासाठी सरकारकडून काही प्रयत्न करण्यात येतात का? किंवा महिलांची संख्या वाढली तर प्रश्न निर्माण होऊ शकतात म्हणून महिलांची संख्या कमीच हवी असा विचार होतो का? सरकारी क्षेत्रात तरी असे काही नकारात्मक मत कुणाचे नाही. आणि ज्या स्त्रिया सरकारी क्षेत्रात आहेत त्या पुरूषांच्या बरोबरीने काम करतात. उदाहरणार्थ डॉक्टर स्त्रियांची संख्या सरकारी क्षेत्रात खूप जास्त आहे. पण त्यांना रात्री थांबून डयूटी करणे अवधड वाटत नाही. सरकारी नोकरीत स्त्रियांचा सहभाग पूर्वीपासून आहेच. यासाठी परीक्षा असतात त्यात कुणालाही सहभागी होता येते. पूर्वी पोलीस खात्यात व आर्मीत मात्र स्त्रियांचा सहभाग नव्हता. पण अता नोकरीत स्त्रियांना तीस टक्के आरक्षण मिळू लागले आहे. या विशेष योजनेमुळे नवी सुरुवात झालेली आहे. याचा खूप मोठा सामाजिक फायदा पण आहे. मात्र त्यांचे ट्रेनिंग, व पोस्टींग या बाबींकडे वरिष्ठ अधिका-यांनी डोळसपणे बघण्याची गरज आहे.

पूर्वी भारतीय प्रशासकीय सेवेतील महिलांची संख्या फार थोडी होती त्यामुळे जेवढ्या महिला होत्या त्यांना मुंबईला मंत्रालयातच कामे दिली गेली. मग आमच्या लक्षात आल की आपणच यात पुढाकार घेतला नाही तर आपल्याला कायम येथेच बसावे लागेल. यानंतर आम्ही प्रत्यक्ष जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रांत जायची तयारी दाखविली व प्रथम रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून शर्वरी गोखले यांना पोस्टिंग मिळाले. ज्यांनी आमची ही मागणी पूर्ण केली ते तत्कालीन मुख्य सचिव होते कसबेकर. त्यांची मुलगी पत्रकार होती. त्यांना कदाचित असं वाटलं असेल की आपण ही मागणी पूर्ण केली नाही तर आपली मुलगीच आपल्याला या महिलांना न्याय द्यायला लावील की काय? मला असं दिसतं की, बरेचदा पुढची पिढी आपल्याला नवीन पावले टाकायला भाग पाडते. आणि 'धिटाईने टाकलेले हे पुढचे पाऊल ही भाविष्यातील गरज असते' हे लक्षात आल्यावर त्याचे महत्व पटते.

पंचायत राज्य व्यवस्था आपण मांडली. त्यातून महिलांचा सहभाग वाढून त्यांनी राजकीय क्षेत्रात यावे असेही आपल्याला वाटते. पण हे खरोखर होतं का? की त्यांचं राजकारणांत येणं हे कागदोपत्रीच रहातं? तसेच स्त्रियांमुळे भ्रष्टाचार कमी होईल का? हा प्रश्न सतत लोकांच्या मनांत येतो. मला वाटतं की कागदोपत्री काही गोष्टी

झाल्या म्हणजे निदान सुरूवात झाली असे तरी आपण म्हणू शकतो. हे पहिले पाऊल असेल. यातून आणखी चांगले काहीतरी होईलच. आज एक स्त्री स्वतःचे मत मांडू शकत नसेल, घरून सांगितल्याप्रमाणे ती बोलत असेल. तरी पुढील वर्षात तिचे व्यक्तिमत्व घडू लागले की ती प्रभावीपणे कार्य करू शकेल. भ्रष्टाचाराचा मुद्दा सर्वव्यापी आहे. स्त्रिया आल्या म्हणून तो कमी होईल असे नाही कारण पुरूष भ्रष्टाचार करतात तेव्हा घरच्या स्त्रीचा त्यात सहभाग असतोच. म्हणजे असे की घरच्या पुरूषाने गैरमार्गाने आणलेला पैसा घरातील स्त्री मान्य करते, क्वचितप्रसंगी पैशाची मागणी करून ती त्याला उत्तेजनही देते. (विरोध करणे अपवादात्मक) त्यामुळे मुळातच चांगल्या व्यक्तींची आज समाजाला गरज आहे. मग ती स्त्री असो वा पुरूष. म्हणूनच प्रशासनांत स्त्रिया आल्या आणी त्यांनी भ्रष्टाचार थांबवला नाही तर त्या अपयशी हा निकष चूक आहे.

स्त्रियांचा सहभाग राजकारणात किंवा पंचायत राज्य व्यवस्थेत वाढण्यासाठी, त्यांना जागरूक करण्यासाठी सतत प्रबोधन करण्याची गरज आहे. तशा कार्यशाळा, चर्चासत्रे, परिसंवाद व इतर माध्यमातून त्यांच्यापर्यंत पोहचण्याची गरज आहे. सरकारने या प्रशिक्षणासाठी फार मोठी तरतूद करायला हवी. तसेच स्वंयसेवी संस्था, महिला मंडळे यांचाही यात सहभाग असू शकतो. याशिवाय एक महत्वाचा विषय मला असा वाटतो की काही तंत्रज्ञान स्त्रियांपर्यंत पोहोचायला हवे. आज असे दिसते की मुली इंजिनीअर होत असतीलही पण कार्यालयीन कामातच त्या अडकलेल्या असतात. प्लंबिंगचं काम किंवा अवजार दुरूस्तीचे काम त्या करीत नाहीत. ग्रामीण भागात, शहरी भागात हा सहभाग वाढला पाहिजे, म्हणजे त्यांना रोजगारही मिळेल आणि त्यांचा आत्मविश्वास वाढेल, त्यांना खरा आवाज मिळेल, मग त्या आपली मते मांडू शकतील.

स्त्रियांचा सहभाग वाढला की कुटुंब व्यवस्था मोडकळीस येईल ही शंका कितपत बरोबर आहे ? कुटुंब- व्यवस्थेत आज एक मोठा मौलिक प्रश्न असा निर्माण झाला आहे की कुटुंबाची सर्व जबाबदारी फक्त स्त्रीनेच सांभाळायची का? समाजाचा घटक म्हणून कुटुंबव्यवस्था टिकविणे हे सर्वाचीच जबाबदारी असायला हवी. पण म्हणून स्त्रियांनी शिकू नये, नोकरी करू नये असे व्हायला नको. ज्या स्त्रीची जशी बुद्धिमत्ता असेल, तिच्यात जे कलाकौशल्य असेल त्याचा उपयोग करण्यासाठी तिला वाव मिळायलाच हवा. यासाठी आपल्याकडे एक नवीन संस्कृती जोपासायला हवी. ती

म्हणजे घरकामांत सर्वांनी हातभार लावायची - मग ते घरकाम स्वयंपाकाच असेल किंवा इतर कांहीही - तरच घरच्या स्त्रीला वाटेल की तिच्या सुखदुःखात कुटुंबातील इतर मंडळी सहभागी आहेत.

स्त्रियांचा सहभाग वाढला तर कुटुंब-व्यवस्था मोडेल हे मत साफ चुकीचे आहे. उलट नोकरीसाठी बाहेर पडणा-या प्रत्येक स्त्रीला कुटुंबव्यवस्थाच योग्य वाटते त्यामुळे त्या स्वतः हून मोडण्याचे प्रयत्न करणार नाहीत.

..............................................